# जवळपास २०० पोलिस ‘आका’चे प्रेमी

## भाजप आमदार सुरेश धस यांचा दावा; यादी मुख्यमंत्र्यांना देणार, मराठवाड्याबाहेर बदलीची मागणी

MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

बीड / प्रतिनिधी

बीड संतोष देशमुख प्रकरणात आता सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी देखील उडी घेतली आहे. बीडमधील २६ पोलिस अधिकारी हे वाल्मीक कराडच्या मर्जीतील असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच वाल्मीक कराडच्या मर्जीतले पोलिस अधिकाऱ्यांची बीडमधून बदली करण्याची देखील त्यांनी मागणी केली आहे. तृप्ती देसाई यांच्या आरोपावर आमदार सुरेश धस यांनी प्रतिक्रिया देत म्हंटले की त्यांनी सांगितलेला २६ हा फार कमी आकडा आहे.एका वृत्तवाहिनीशी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले, तृप्ती देसाई यांनी सांगितलेला २६ हा फार कमी आकडा आहे. सर्व कर्मचारी पोलिस अधिकारी यांची जर बेरीज केली तर ती २०० इतकी होईल. मी लवकरच यादी करणार आहे आणि मुख्यमंत्र्यांना देणार आहे, असे सुरेश धस म्हणाले आहेत.सुरेश धस म्हणाले, फक्त २६ नाही तर १५० ते २०० अधिकारी हे वाल्मीक कराडच्या मर्जीतले असतील. तृप्ती देसाई यांनी २६ हा फार कमी आकडा सांगितला आहे. सर्व पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची बेरीज केली तर २०० इतकी होईल. त्यांनी हा आकडा कमी सांगितला आहे. मी लवकरच या सर्वांची यादी मुख्यमंत्र्यांना देणार आहे. या सर्वांची बदली बीडच्या बाहेर नव्हे तर मराठवाड्याच्या बाहेर करावी, असेही मी त्यांना सांगणार आहे.पुढे बोलताना सुरेश धस म्हणाले, आकाचे पोलिस दलातील जे प्रेमी आहेत. आतापर्यंत एसपींनी पोलिस दलातच कसे ठेवले. मी कितीतरी वेळा याबद्दल बोललो आहे. महादेव मुंडेचे आरोपी आकाच्या मुलाच्या अवतीभवती फिरत होते. ते लगेच गायब झाले. त्या डीवायएसपी यांनी देखील अजून चार्ज घेतला नाही. ते सुद्धा आकाचेच आहेत, असा आरोप सुरेश धस यांनी केला आहे.

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –१३२ | सोमवार दि.२७ जानेवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -132 | MONDAY DT.27 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |

# महादेव मुंडेंच्या पत्नीला बीडच्या पोलीस डीवायएसपीचं मोठं आश्वासन

## वाल्मिक कराडचा मुलगा मोठ्या अडचणीत सापडणार?

बीड: परळीतील महादेव मुंडे खून प्रकरणात मुंडे कुटुंबीयांनी सोमवारी अंबाजोगाईचे पोलीस उपअधीक्षक अनिल चोरमले यांची भेट घेतली. यावेळी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी पोलीस अधिकाऱ्यांशी त्यांच्या पतीच्या हत्याप्रकरणाच्या तपासाबाबत चर्चा केली. या चर्चेअंती बीडचे पोलीस उपअधीक्षक अनिल चोरमले यांनी महादेव मुंडे यांच्या पत्नीला आरोपीला लवकरात लवकर अटक करण्याचे आश्वासन दिले. ज्ञानेश्वरी मुंडे यांनी सोमवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना यासंदर्भात माहिती दिली.

परळीच्या पोलीस अधिकाऱ्यांनी अद्याप या प्रकरणाची फाईल आम्हाला पाठवली नाही. ही फाईल आज आम्हाला मिळेल. त्याचा अभ्यास करुन मी काय तपास करायचा हे सांगतो. तसेच अनिल चोरमले यांनी या प्रकरणाचा योग्य तपास करू असे आश्वासन दिले मुंडे यांच्या कुटुंबीयांना दिले आहे. या प्रकरणाच्या फाईलची स्टडी केल्यानंतर पुढील चार ते पाच दिवसात पुन्हा मुंडे कुटुंबियांशी चर्चा होणार आहे. पोलिसांनी आरोपीला अटक करण्याचे आश्वासन दिल्याचे मयत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी सांगितले आहे.

बीडचे पोलीस डीवायएसपी नेमकं काय म्हणाले?

महादेव मुंडे यांच्या हत्याप्रकरणात आम्ही १०० टक्के रिझल्ट काढू. अजून परळीच्या पीआयने ती फाईल आमच्यापर्यंत पाठवली नाही, अजून त्यांच्या केसची कागदपत्रं इथपर्यंत पोहोचलेली नाहीत. ही फाईल आज आम्हाला मिळेल. त्यानंतर चार पाच दिवसांमध्ये ही फाईल वाचून मी तुम्हाला पुढील माहिती देतो. मला चार दिवस द्या, मी याप्रकरणाचा फॉलोअप घेतो. आपण आरोपीला १०० टक्के पकडू, असे बीडचे पोलीस डीवायएसपी अनिल चोरमले यांनी यांनी महादेव मुंडे यांच्या पत्नीला सांगितले. त्यामुळे आता पुढील काही दिवसांत पोलीस



याप्रकरणात काय कारवाई करणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

### वाल्मिक कराडचा मुलगा गोत्यात येणार?

महादेव मुंडे यांच्या हत्याप्रकरणात वाल्मिक कराड यांचा मुलगा सुशील कराड अडचणीत येण्याची शक्यता आहे. महादेव दत्तात्रेय मुंडे या पिग्मी एजंट, दूध व्यवसायिकाचा २१ ऑक्टोबर २०२३ च्या रात्री वन विभागाच्या समोरील मोकळ्या जागेत गळ्यावर, चेहऱ्यावर हातावर धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आला होता. त्याच घटनास्थळावरून कराडचा मुलगा सुशील कराडने मोबाईलवर फोन केल्याचा देखील धस यांनी आरोप केला होता.

### महादेव मुंडे हत्याप्रकरण नेमकं काय?

परळी तालुक्यातील भोपळा येथील मूळ रहिवासी असलेले महादेव मुंडे यांचा खून करण्यात आला होता. २२ ऑक्टोबर २०२३ रोजी तहसील कार्यालयाजवळील प्रांगणात महादेव मुंडेंचा मृतदेह आढळला. या प्रकरणी अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात १४ महिने उलटले तरी आरोपी फरारच आहे. या खून प्रकरणाचा परळी पोलिसांकडून तपास करण्यात आला नाही, असा आरोप आमदार सुरेश धस यांनी केला होता. महादेव मुंडे हत्या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप आणि प्रगतीला उशीर झाल्याचा आरोप होत असताना बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी तपास पोलीस उपअधीक्षकांकडे सोपविण्याचे आदेश दिले होते.




सिरसाळा /प्रतिनिधी

दिनांक २६ जानेवारी प्रजासत्ता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सरस्वती विद्यालय मध्ये संविधान पृथ्वीचे वाचन करण्यात आले व विद्यार्थ्यांना संविधानाची सखोल माहिती शाळेचे मुख्याध्यापक कांदे सर यांनी दिली आहे. यावेळी शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक क्षेत्रात उंच भरारी घेतलेल्या विद्यार्थ्यांचे व संस्कृत कार्यक्रमात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. यावेळी उपस्थित या गावचे माजी सरपंच सतीश काका आचार्य सरपंच रामभाऊ तात्या घोडके चेअरमन तुकाराम आचार्य बाळासाहेब किरवले राधा कृष्णाचारी गोविंदांना घोडके वैजनाथ गांगर्डे भारत पवार बाबासाहेब किरवले यामध्ये आचार्य टाकळी कानडी वसंतपूर तांडा कवडगाव घोडा इत्यादी विद्यार्थ्यांचे पालक व बंजारी समाजाच्या महिला जास्त जास्त उपस्थित होते.

## आज दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी स्पर्श जनजागृती अभियान व कुष्ठरोग निवारण दिनानिमित्त शपथ घेताना – नितीन महुवाले

ग्रामपंचायत तळेगाव येथे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त बीड जिल्हा कुष्ठरोग मुक्त करण्यासाठी समस्त नागरिकांना प्रतिज्ञा व शपथ घेताना आरोग्य सेवक नितीन महुवाले , प्रथम ध्वजारोहण सरपंच श्रीमती अश्विनी ताई उद्धव घोलप यांच्या हस्ते करण्यात आले प्रतिज्ञा अशी की मी आज स्पर्श जनजागृती अभियान व कुष्ठरोग निवारण दिनानिमित्त शपथ घेतो / घेते की, कुष्ठरोगाचे संशियत लक्षण असलेल्या व्यक्तीला जवळच्या आरोग्य केंद्रामध्ये जाण्यासाठी प्रेरित करेल जर कुष्ठरोग असेल तर त्याला पूर्ण उपचार मिळावे यासाठी मदत करण्याची मी



दक्षता घेईल जर माझ्या जवळपास मित्रामध्ये शेजारी आणि समाजामध्ये कोणी कुष्ठरोगी असेल तर मी त्यांच्या / तिच्या सोबत बसणे , खाणे, फिरणे याबाबत कुठल्याही प्रकारचा भेदभाव करणार नाही ,

मी अशी सुद्धा शपथ घेतो / घेते की, कुष्ठरोग पीडित व्यक्तीबरोबर सामाजिक भेदभाव होणार नाही यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील राहील , मी अशी शपथ घेतो / घेते की , राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या कुष्ठरोग मुक्त भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहील , अश्या प्रकारची शपथ घेण्यात आली तसेच सरपंच श्रीमती अश्विनी ताई उद्धव घोलप , उद्धव घोलप , उपसरपंच अशोक मस्के , ग्रामसेवक अच्युतराव चाळक , ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी ,आरोग्य विभागातील कर्मचारी वर्ग , अंगणवाडी सेविका , विद्यार्थी , आशा वर्कर , गावातील जेष्ठ नागरिक , उपस्थितांना आदीना आरोग्य सेवक नितीन महुवाले यांनी शपथ व प्रतिज्ञा घेतली

# आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांचा आरोग्य बाणा!

बीड /प्रतिनिधी

देशाचा नागरिक म्हणून आपल्या देशाची सेवा कुठल्या ना कुठल्या माध्यमातून करण्याचा प्रत्येकाचा एक ध्यास असतो. असाच एक ध्यास बाजीराव चव्हाण युवा मंचचे अध्यक्ष रोहित धुरंधरे यांनी आरोग्य दूत बाजीराव दादा चव्हाण यांच्या पाशी मांडला. की भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी आपल्या बीड शहरातील नागरिकांच्या सेवेसाठी एक भव्य दिव्य असे दंतरोग निदान शिबिर बीड मध्ये राबवले पाहिजे. रुग्णांच्या सेवेसाठी नामांकित डॉक्टर्स यांच्या टीमच्या माध्यमातून २६ जानेवारी रोजी एकदा आपण एक मोफत शिबीर राबवू. तेव्हा आरोग्य दूत बाजीराव चव्हाण यांनी क्षणाचाही विलंब न करता एका दिवसात रुग्ण सेवा ईश्वर सेवा हे ब्रीदवाक्य समोर ठेवता. २६ जानेवारीला बीड मधील लोकसेवा दंतचिकित्सालय, नगर नाका बीड, येथे हे दतरोगनिदान शिबिर सामान्य गरजूंच्या हितासाठी राबवण्यास परवानगी दिली. तेव्हा लगेचच आरोग्य दूत बाजीराव (दादा) चव्हाण युवा मंचचे अध्यक्ष रोहीत धुरंधरे हे लोकसेवा डेंटल क्लिनिकचे चे डॉक्टर किरण वनवे सर यांना भेटून एका दिवसात

### २६ जानेवारी दिवशी दंतरोग शिबिरात बीडमधील शेकडो गरजू रुग्णांचा केला मोफत उपचार

**प्रजासत्ताक दिनानिमित्त बीडमध्ये बाजीराव चव्हाण युवा मंचचे भव्य मोफत दंतरोग चिकित्सा शिबीर संपन्न**

**बाजीराव चव्हाण युवा मंच अध्यक्ष रोहीत धुरंधरे यांनी २६ जानेवारी निमित्त मोफत दंत तपासणी राबवून बीड मधील शेकडो गरजू रुग्णांना मोफत सेवा दिली.**

या भव्य दिव्य मोफत दंत रोगनिदान शिबिराचे आयोजन केले. या मोफत शिबिरामध्ये बीड सह गेवराई आणि बीड मधील ग्रामीण भागातील शेकडो गरजू गरीब रुग्णांनी या मोफत शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. डॉ किरण वनवे सर, डॉ, भक्ती वनवे, नंदू बागलाने, व त्यांच्या सर्व टीमने या शिबिरामध्ये रुग्णांची दात काढणे, रूट कॅनल, इम्पलंत ट्रीटमेंट, स्माईल डिझायनिंग, दाताला पिना बसवणे, इत्यादी अनेक दंत रोगावरील रुग्णांना मोफत सेवा देण्यामध्ये आपली महत्त्वपूर्ण योगदान दिले. हे मोफत शिबीर सर्व सामान्यासाठी राबवून आरोग्यदूत दूत बाजीराव चव्हाण यांनी आपल्या भारत देशाचा मान आणि सेवा करण्याचा ध्यास






हा पुन्हा एकदा आजच्या २६ जानेवारी निमित्त मोफत दंत रोग निदान शिबिराच्या माध्यमातून शेकडो गरजू रुग्णांची मोफत सेवा करून दाखवून दिला आहे. आजच्या झालेल्या मोफत शिबिरातून बीड मधील शेकडो गरजू रुग्णांची झालेली सेवा ही बाजीराव चव्हाण यांना आशीर्वाद देणारी मानली जात आहे. या शिबिराचे आयोजक बाजीराव (दादा) चव्हाण युवा मंचचे अध्यक्ष रोहीत धुरंधरे, यांनी केले. यावेळी सहकारी मित्र शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हाप्रमुख महादेव मातकर, मनसे शहर प्रमुख अमर जान पठाण साहेब, वैद्यकीय उपजिल्हा प्रमुख शरद झोडगे, सिताराम ढोले फाउंडेशनचे अशोक ढोले पाटील, युवक क्रांतीचे संपादक लक्ष्मण गायकवाड, पत्रकार विलास शिंदे,

# तहसील कार्यालय बीड येथे आपले सरकार केंद्रचालक व सेतू चालक यांची बैठक संपन्न



तहसील कार्यालय बीड येथे ग्रीस्टॅक योजनेच्या अंमलबजावणी बाबत व राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या सूचनांचे अंमलबजावणी साठी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या सूचनेनुसार २६ जानेवारी रविवार रोजी ध्वजारोहणच्या कार्यक्रमाननंतर बैठक संपन्न झाली . जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जिल्ह्यातील सर्व आपले सरकार केंद्र चालक अथवा सेतू केंद्र चालक यांनी जनतेची कामे तात्काळ करावी , कोणीही सर्वसामान्य लोकांची अडवणूक करू नये , अशा स्वरूपाच्या सूचना दिल्या आहेत . त्याला अनुषंगून निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सेतू केंद्रचालक अथवा आपले सरकार केंद्रचालक यांच्यामार्फत देण्यात येत असलेल्या सुविधांची वेळोवेळी तहसीलदार व नायब तहसीलदार यांनी पाहणी करावी असा अशा सूचना दिल्या आहेत . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या सूचनेनुसार या बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले .

राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात १५ जानेवारी रोजी बैठक घेतली होती . या बैठकीत माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात झपाटयाने बदल झालेला आहे . हा बदल पाहता आपल्या कामाचा निपटारा लवकर होण्याच्या दृष्टीने व शासकीय कामात पारदर्शकता यावी यासाठी तंत्रज्ञानाचा अधिक वापर करुन नागरिकांनी ऑनलाईन अर्ज भरावेत असे आवाहन केले होते . यावेळी त्यांनी सेतू सुविधा केंद्रास भेटही दिली होती . त्यावेळी डॉक्टर जाधव यांनी सेतू केंद्रामध्ये नागरिकांना ऑनलाइन तक्रार व अपील दाखल करण्याची सुविधा उपलब्ध असल्याबाबत सर्वांनी सूचनाफलक लावावा अशा सूचना दिल्या होत्या .

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग : महाराष्ट्र राज्यामध्ये नागरिकांना सेवेचा हक्क देणारा क्रांतीकारी कायदा म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम , २०१५ . या कायद्यान्वये राज्याच्या नागरिकांना पादर्शक , गतिमान व कालबध्द सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे . या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्याकरीता महाराष्ट्र सेवा हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली . दिनांक १ मार्च, २०१७ रोजी राज्याचे माजी मुख्य सचिव , स्वाधीन क्षत्रिय यांची राज्याचे पहिले राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली . दि.०४. ०५ . २०२३ रोजी पासून राज्याचे माजी मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव , भा.प्र.से. (से.नि.) यांनी मुख्य आयुक्त , राज्य सेवा हक्क आयोग म्हणून कार्यभार स्विकारला आहे .

या कायद्याअंतर्गत कोणत्या सेवा नागरिकांना प्राप्त करून घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे , ही माहिती आपण आर.टी.एस. महाराष्ट्र या मोबाईल प वर किंवा आपले सरकार वेब पोर्टल वर पाहू शकता . सेवा प्रदान करताना विलंब झाल्यास किंवा संयुक्तिक कारण नसताना सेवा नामंजूर करण्यात आली तर नागरिक प्रथम/ द्वितीय अपील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे व तिसरे आणि शेवटचे अपील आयोगाकडे दाखल करू शकतात .

ग्रीस्टॅक काय आहे : भारत सरकार ग्रीस्टॅक ही संकल्पना देशात राबवीत आहे . या संकल्पनेअंतर्गत देशातील शेतकऱ्यांचे पायाभूत माहिती संच तयार करण्यात येणार आहेत . शेतकऱ्यांना ग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र देण्यात येणार आहे . हे शेतकरी ओळखपत्र शेतकऱ्यांसाठी त्यांच्या शेतीविषयक आणि शासकीय कामासाठी वापरता येणार आहे . शेतकरी ओळखपत्र हे ऑनलाईन स्वरूपाचे असणार आहे . या ओळखपत्रासाठी शेतकऱ्याला ऑनलाईन नोंदणी करावी लागणार आहे . शासनाच्या अग्रीस्टॅक वेबसाईट वरती जावून शेतकऱ्याला स्वतः ची आणि आपल्या शेतीची पूर्ण माहिती भरावी लागणार आहे . या ऑनलाईन प्रोसेस मध्ये आधार कार्ड सातबारा आणि होल्डिंगशी जोडले जाणार आहे .

विशेष म्हणजे २६ जानेवारीच्या मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमानंतर क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते बीड तालुक्यातील बहादरपूर येथील लताबाई कोळेकर व कविता गोयकर यांना ग्रीस्टॅक अंतर्गत उत्कृष्ट सहभाग नोंदवला म्हणून सन्मानपत्र देण्यात आले . ग्रीस्टॅक प्रकल्पाचे अंमलबजावणीचे अनुषंगाने तहसिल कार्यालय बीड अतंर्गत येणारे आपले सरकार केंद्रचालक व सेतू चालक यांची सकाळी १० वाजता ग्रीस्टॅक प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे अनुषंगाने तहसील कार्यालय बीड येथे बैठक संपन्न झाली . सर्व उपस्थित आपले सरकार केंद्रचालक यांना ग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी माहिती संच निर्मिती बाबत सर्व तालुक्यात कॅम्पचे नियोजन करणे , त्यामध्ये गावातील मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , कृषी सहाय्यक , ग्रामसेवक यांचा सहभाग असावा अशा सूचना नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी दिल्या . शासनाने ठरविलेल्या नियोजनानुसार सर्व काम वेळेत पुंर्ण करणेबाबत इत्यादी संदर्भामध्ये कॅम्पचे आयोजन करावे असे आवाहन त्यांनी केले . तसेच सर्वांनी शेतक-यांसाठी सेवाभाव वृत्तीने काम करणेबाबत सर्वांनी जनतेची कामे विहित वेळेत पार पाडली पाहिजेत असे सांगितले . सदरील बैठकीत सर्वांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच या ग्रीस्टॅक कामकाजाच्या अनुषंगाने तालुकास्तरीय मास्ट्रर ट्रेनर यांचे ही मोबाइल क्रमांक देण्यात आले .

यावेळी तहसील कार्यालयांतर्गत संजय गांधी निराधार योजना , श्रावण बाळ योजना यासंदर्भात देखील सर्वांना माहिती देण्यात आली . तहसीलदार चंद्रकांत शेळके हे नागरिकांकडून कोणीही अतिरिक्त शुल्क येऊ नये , यासाठी आग्रही असतात , तशा सूचना यावेळी देण्यात आल्या . तसेच सेवाहमी कायद्यांतर्गत अपील करणा-या तरतुदीचे बॅनर लावणेबाबत देखील सूचना देण्यात आल्या . ग्रीस्टॅक प्रकल्पाचे अनुषंगाने सर्व गावनिहाय आम्ही भेटी देणार असून सदरील काम विहित वेळेत पाडण्यासाठी सर्वांनी उत्साह दाखवावा असे आवाहन नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी केले . या बैठकीस सी एस सी चे जिल्हा मॅनेजर दिनेश जाधव हे देखील उपस्थित होते . त्यांनी देखील ग्रीस्टॅक अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शन केले . तसेच तालुकास्तरीय मास्ट्रर ट्रेनर यांनी ही याबाबत मार्गदर्शन केले .

सदर बैठकीस प्रशांत जाधवर , नायब तहसीलदार , दिनेश जाधव सी एस सी चे जिल्हा मॅनेजर , राहुल कसबे , सहायक महसूल अधिकारी , कृष्णा रत्नपारखी ग्राम महसूल अधिकारी , सरोजिनी बोराडे , महसूल सहायक , राजाभाऊ गवळी , सेतुचालक पिंपळनेर , सतिश जाधव , विजय क्षिरसागर , विलास वरेकर , श्रीकांत पंडीत , सेतुचालक बीड व बीड तालुक्यातील सेतूचालक उपस्थित होते .

## वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेची बैठक; शहराध्यक्ष पदी लव्हाळे मॅडम नियुक्त

वडवणी/प्रतिनिधी

सेलू जिल्हा परभणी येथे आयोजित करण्यात आलेल्या आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व राज्यस्तरीय मेळाव्याच्या निमित्ताने सर्वांनी मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन करत याच बैठकीत वडवणी शहराध्यक्ष पदी पत्रकार गितांजली लव्हाळे मॅडम यांची सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आल्याची घोषणा डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केली.

याबाबत अधिक वृत्त असे की, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख यांच्या सुचनेनुसार डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी नुकतीच वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यालयात घेतलेल्या बैठकीच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्यकारिणी पदाधिकारी व जिल्हाध्यक्ष यांनी सेलू येथे राज्यस्तरीय मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन केले. त्याच बरोबर वडवणी तालुक्याचे जेष्ठ मार्गदर्शक पत्रकार सुधाकर पोटभरे, तालुकाध्यक्ष सतिश सोनवणे,सचिव महेश सदरे यांच्या मागणीनुसार मराठी पत्रकार परिषदेच्या वडवणी शहराध्यक्ष पदी पत्रकार गितांजली लव्हाळे मॅडम यांची निवड यावेळी जाहीर करण्यात आली. त्याच बरोबर वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे नवीन सदस्य पत्रकार राम चौरे यांच्या नावाला सर्वांनी संमती दर्शवली. या दोघांचा उपस्थित सर्व पदाधिकारी व सदस्यांनी कार्यालयाच्या वतीने यथोचित सत्कार



करुन दोघांनाही शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे म्हणाले की, मराठी पत्रकार परिषद ही आपली मातृसंस्था आहे. राज्यांतील पत्रकारांच्या हितासाठी सदैव तत्पर असणारे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांचे हात बळकट करणे आपले कर्तव्य आहे. ज्या ज्या वेळी राज्यातील पत्रकार अडचणीत सापडतात त्या त्या वेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, विश्वस्त किरण नाईक विश्वस्त शरद पाबळे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर सह राज्यस्तरीय पदाधिकारी तत्पर असतात. त्यामुळेच राज्य सरकारचे मराठी पत्रकार परिषदेवर विशेष लक्ष असते हे सर्वश्रुत आहे. मराठी पत्रकार परिषदेचा सेलू जिल्हा परभणी येथे आयोजित करण्यात आलेल्या आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघाच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात आपण सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहनही प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले.

या प्रसंगी जेष्ठ पत्रकार सुधाकर पोटभरे, तालुकाध्यक्ष सतिश सोनवणे सचिव महेश सदरे यांनी देखील आपल्या महत्त्वाच्या सूचना मांडल्या. यावेळी तालुका कोषाध्यक्ष वाजेद पठाण,डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष ओमप्रकाश साबळे,तालुका उपाध्यक्ष धम्मपाल डावरे,पत्रकार हरी पवार,पत्रकार अतुल जाधव,पत्रकार संभाजी लांडे,पत्रकार राम चौरे,पत्रकार विजय राऊत,पत्रकार हर्षद उंडाळकर सह आदींची उपस्थिती होती.



**चौसाळा /प्रतिनिधी**

**सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती चौसाळा शहर - २०२५ नवनिर्वाचित उपाध्यक्ष तथा भाजपा अल्पसंख्यांक आघाडी बीड तालुकाध्यक्ष सलीमभाई जहागीरदार यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी शिवशक्ती - भीमशक्ती विचार मंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील,भाजपा अनुसूचित आघाडीचे बीड तालुकाध्यक्ष पवनजी कुचेकर, भाजप युवा नेता अप्पासाहेब झोडगे पाटील,राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे चौसाळा सर्कलचे युवानेते ज्ञानेश्वर आंधळे, युवा उद्योजक सोहेलशेठ पठाण आदींची उपस्थिती होती**



**बीड - अल - खैर मल्टीपर्पज फाऊंडेशन च्या वर्धापन दिन व प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित महा रक्तदान शिबिर मध्ये रक्तदान करतांना इरफान मोहम्मद**

## छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल व छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण समस्यांच्या विळख्यात

### प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन; क्रिडामंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन :- डॉ.गणेश ढवळे

बीड /प्रतिनिधी

खेळाडूंना आपल्याकडे असलेल्या खेळातील कौशल्याला पुढे संधी मिळावी आणि त्यामधून खेळाडू निर्माण व्हावेत या उद्देशाने क्रिडा संकुलांची निर्मिती करण्यात आली.खेळाडुंसाठी उपयुक्त ठरणारे बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल आणि छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण समस्यांच्या विळख्यात असुन संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष आणि नियमित देखभाल करण्याकडे दुर्लक्ष यामुळे खेळाडुंना असुविधेचा सामना करावा लागत आहे. क्रिडा संकुलाच्या विकासासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात मंजूर करण्यात आलेला निधी जिल्हा प्रशासनाच्या उदासीनतेमुळे बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यातील क्रिडांगणाची विकास कामे रखडलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे क्रिडा संकुलाच्या विकासासाठी आवश्यक निधी देण्यात यावा. आणि रखडलेली कामे पूर्ण ताकडीने पुर्ण करण्यात यावीत. क्रीडा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यात यावीत. पावसाळ्यात छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुलात पाणी साठल्याने निचरा होत नसल्याने खेळाडुंची अडचण होते.आणि छत्रपती संभाजी




महाराज क्रिडा संकुलावर घेण्यात येणा-या राजकीय कार्यक्रमांवर निर्बंध आणावेत या मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२६ प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात येऊन क्रिडा मंत्री महाराष्ट्र राज्य दत्तात्रय भरणे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनातील मुद्यांबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन क्रिडा मंत्र्यांनी दिले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, शेख मुबीन ,शिवशर्मा शेलार आदी सहभागी होते.

छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणाची दुरावस्था झाली असुन नगरपरिषदेमार्फत नियमित स्वच्छतागृहांची साफसफाई करण्यात येत नसल्याने सकाळी आणि सायंकाळी व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. सुरक्षा रक्षक नसल्याने रात्री अपरात्री त्याठिकाणी अवैध धंदे चालतात,दारुड्यांचा राबता असतो. व्यायामासाठी बसविण्यात आलेले लोखंडी साहित्याची मोडतोड झाली असुन याकडे नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. तसेच या क्रिडांगणावर राजकीय सभा व इतर कार्यक्रमांमुळे क्रिडांगणाची दुरावस्था होत असुन या कार्यक्रमांवर निर्बंध घालण्यात यावेत.हे क्रिडांगण खेळासाठी आरक्षित आहे. खेळाव्यतिरिक्त कोणत्याही कार्यक्रमास परवानगी देण्यात येऊ नये अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.



### दत्तात्रेय मामा भरणे यांचा एम आर पी च्या वतीने सत्कार

गेवराई /प्रतिनिधी

महाराष्ट्रराज्याचे मंत्री क्रीडा व अल्पसंख्यांक विकास. औकाफ विभागाचे मंत्री नामदार दत्तात्रय मामा भरणे साहेब हे प्रजासत्ताक दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमानिमित्त शासकीय विश्रामगृह बीड येथे आले असता महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी उपस्थित पदाधिकारी दत्तात्रय सौंदरमल अनिल भगत सामाजिक कार्यकर्ते डोंगरे सर अमोल बनसोडे राम साबळे महादेव सोळंके योगेश कदम शशीपाल जाधव विनायक दाभाडे शिरसाठ मामा इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते




वडवणी /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा काडीवडगाव येथे, भारतीय प्राजक्ताक दिनानिमित्त त्रिमूर्ती सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ क्रियाशील केंद्र देवडी या संस्थेमार्फत जिल्हा परिषद शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले, याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, ईश्वर पटाईत, डॉ.गोरक्षनाथ वांडेकर. सरपंच गोविंद बादाडे , बालासाहेब राऊत धावरे गोविंद,जामकर सर, बादाडे सर, विजयामला बादाडे, व तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते,

# नरेगा अंतर्गत झालेल्या बोगस कामाची चौकशी साठी उपसरपंच अक्रम सौदागर यांचे उपोषणास तात्पुरती स्थगिती

## आठ दिवसांत आत्मदहन करण्याचा इशारा

तलवाडा /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील कोट्यावधी रुपयाचा झालेला घोटाळा प्रकरणी चक्क तलवाडा येथील उप सरपंच अक्रम सौदागर हे गेवराई पंचायत समितीच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले असता गट विकास अधिकारी कांबळे मॅडम यांनी आठ दिवसात कारवाई करण्याचे आदेश देताच उपोषण स्थगित करण्यात आले आहे कारवाई न झाल्यास उपसरपंच आक्रम सौदागर यांनी आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला आहे




याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत मोठ्या प्रमाणात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून याच ठिकाणी ग्रामरोजगार सेवक यांनी पदाचा गैरवापर करून चक्क आपल्या मयत आजोबा यांच्या नावावर लाखो रुपये उचलून शासनाच्या पैशाची अप्रतपर केली असून बोगस मस्टर काढण्यात आलेले आहे एवढेच नाही तर चक्क ग्राम पंचायत सदस्य पती यांनी नरेगा अंतर्गत कामाचे बोगस मस्टर तयार करून दिले उचलले असल्याचे दिसून येत आहे असे अनेक घोटाळे उपसरपंच आक्रम सौदागर यांनी उघडकीस आणले असून अशा दोशींवर कारवाई करण्यासाठी ते चक्क २६ जानेवारी रोजी पंचायत समिती कार्यालयात उपोषणाला बसले असून त्यांच्या मागणीची दखल घेत गटविकास अधिकारी कांबळे मॅडम यांनी उपोषण आठ दिवसात करवाई करण्याचे लेखी आश्वासन देऊन उपसरपंच आक्रम सौदागर यांनी उपोषण मागे घेतले या वेळी लहुजी साळवे क्रांती सेनेचे जिलध्यक्ष दादाराव रोकडे, सुमेध करडे,अर्जुन भामरे, राहुल आठवले आदी जण उपस्थित होते



# चौसाळा येथिल सार्वजनिक शिवजंयतीच्या अध्यक्षपदी सतीषरावजी जोगदंड तर सचिवपदी पवन कुचेकर

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्राचे आराध्य दैवत कुळवाडी भुषण राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सार्वजनिक जयंती निमित्त बीड तालुक्यातील चौसाळा येथे सर्वानुमते व्यापक बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये भवानी ग्रुप संचलित सार्वजनिक शिवजयंतीच्या अध्यक्षपदी सतीषराव जोगदंड तर उपाध्यक्षपदी सलीम जहागिरदार व सचिवपदी पवनजी कुचेकर कोषध्यक्षपदी दत्ता जाधव तर सहकोषध्यक्षपदी गणेश काकडे यांची एकमताने निवड करण्यात आली या बैठकीस भवानी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर गुजांळ ,शिवशक्ती भिमशक्ती विचार मंचचे प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब मोरे,विजय राजे शिंदे,गणेश (आबा)गुजांळ,महम्मद शरीफ,जेष्ठ पत्रकार बळीराम राऊत,पत्रकार अमोल तांदळे,चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर,बाळासाहेब जोगदंड,विक्की गुजांळ,विकास चव्हाण,पंजाब वाघमारे,किशोर ढोकणे,किरण अनभुले,अलिम मुलानी,किरण कुचेकर,मोहन जोगदंड,मुन्ना झोडगे,सोहेल पठाण,बबलु शिंदे,उत्तम जाधव,सचिन चव्हाण यांच्यासह असंख्य शिवप्रेमी मोठया संख्येने उपस्थीत होते.



## एम एस वस्तानवी इंटरनॅशनल स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहने साजरा


गेवराई - आज प्रजासत्ताक दिनानिमित्त एम एस वस्तानवी इंटरनॅशनल स्कूल येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम मुफ्ती उमर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शाळेचे विद्यार्थ्यांनी विविध कला व संस्कृतीवर आधारित नृत्य सादर करून प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा केला.या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक मौलाना मुबीन , हाफिज अनिस, मौलाना सिराज, मुफ्ती राज, हिमायत फाउंडेशन चे शेख मुजीब यांच्यासह सर्व शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशभक्तीने प्रेरित असा हा सोहळा अतिशय स्मरणीय ठरला.

# मंगळवारी लोककला संवर्धन राष्ट्रीय परिषद

अंबाजोगाई /प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर आणि योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचा नाट्यशास्त्र विभाग आयोजित लोककला संवर्धन राष्ट्रीय परिषद दि.२८ जानेवारी मंगळवार रोजी नागापूरकर सभागृह योगेश्वरी शिक्षण संस्था परिसरात होणार आहे.या परिषदेत बीड येथील कलावंत लोकवाद्यांचे प्रदर्शन आणि सादरीकरण करणार आहेत. याच परिषदेमध्ये अंबाजोगाईतील जगत जननी भजनी मंडळ राम मंदिर,धाकटे आणि थोरले देवघर येथील लळीत रंगकर्मी सर्वज्ञ दासोपंत लळीताचे सादरीकरण तसेच एडके हे पोवाडा आणि कु. सृष्टी आचार्य ही लावणी सादर करणार आहे,तसेच उखाणे सादरीकरण सौ.उमिता गोस्वामी करणार आहेत. या संपूर्ण परिषदेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय ख्यातकीर्त पं.उद्धव बापू आपेगावकर हे करणार असून बीजभाषक म्हणून लोक कलेचे अभ्यासक डॉ.संजय देशमुख, केएसके महाविद्यालयाच्या नाटयशास्त्र विभागाचे प्रमुख,उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, उपस्थित राहणार आहेत. या संपूर्ण परिषदेमध्ये लोककलांच्या संवर्धनाविषयी चर्चासत्रे आणि संशोधन पर लेखांचे वाचन आयोजित केलेले आहे.

यात ऑनलाईन पद्धतीने डॉ गणेश चंदनशिवे लोककला विद्यापीठ मुंबई,डॉ. साईश देशपांडे लोककला अभ्यासक गोवा डॉ.मोनिका ठक्कर,गुजराती लोककला अभ्यासक मुंबई,आणि डॉ. वैशाली गोस्वामी (नांदेड) विविध लोककलांची माहिती देणार आहेत. तरीअंबाजोगाई आणि परिसरातील सर्व वाचक, रसिक प्रेक्षक, श्रोते, आणि आस्वादकांनी उपस्थित राहून या आस्वाद घ्यावा असे



आवाहन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर , सचिव कमलाकर चौसाळकर स्वारातीमहा.चे प्राचार्य डॉ पी.आर.थारकर आणि या स्पर्धा संयोजिका नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.संपदा कुलकर्णी यांनी केले आहे.



## माजलगाव अल-खिदमत एज्युकेशन फाऊंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

आज प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२५ रोजी मदरसा अरबिया तज़्वी-दुल कुरान पात्रुड कैंम्प येथे मौलाना व शिक्षक यांच्या उपस्थितीत झेंडा वंदन करण्यात आला अनेक विद्यार्थीनी देशप्रेमी गीत गायन कार्यक्रमात सहभाग घेतला व अल-खिदमत एज्युकेशन फाऊंडेशनच्या वतीने मदरशात अनेक मैदानी खेळाचे आयोजन करण्यात आले होते आणि खेळात विजयी झालेल्या विद्यार्थांना प्रमुख पाहुणेच्या उपस्थित शालेय साहित्य वाटप करण्यात आले.




सांय. दैनिक महाराष्ट्र आरंभ चे संपादक दीपक भाऊ थोरात, उद्धव आरे, सचिन अवचार(एडवोकेट) देवडीचे सरपंच अतुल झाटे, ख. लिमगावचे सरपंच गणेश अंबुरे, एसएफआय चे तालुका सचिव अभिषेक आडागळे, मच्छिंद्र बप्पा झाटे, विश्वास आगे, गितेश आगे, दिलीप अवचर,राहुल वैरागे, दत्ता राऊत डीजेचे मालक, आकाश राऊत(इंडियन आर्मी), आकाश साळवे (सिव्हिल इंजिनिअर), गणराज पोळ(ऑपरेटर), मदन आडगळे, महादेव लोंढे,दामोदर आडागळे, परमेश्वर आडागळे, बाळनाथ आडागळे व इतर पदाधिकारी गावातील जेष्ठ नागरिक उपस्थित होते

# निवड़णुक आयोगाने मतदारांच्या भावनांचा आदर करावा - रणदिवे

धारुर / प्रतिनिधि

२५जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करण्यात येतो त्या अनुषंगाने राष्ट्रीय कॉंग्रेस धारुर च्या कॉंग्रेस पदाधिकारी यांनी तालुकाध्यक्ष सिध्देश्वर रणदिवे यांच्या नेतृत्वाखाली मतदारांच्या वतीने धारूर तसिलदार यांना निवेदन देऊन निवडणूक अयोगाने मतदारांचा विश्वास राहवा असे कार्य करावे.मागील निवडणूकीत निवडणूक अयोगाने घेतलेले निर्णय वादादीत राहीलेत. तरी निवडणूक आयोगाने निपक्षपणे काम करावे. यावेळी तालुकाध्यक्ष सिध्देश्वर रणदिवे, सुबराव सोळंके, प्रभाकर चव्हाण, आवेज खुरेशी, राधाकृष्ण गवळी, महादेव सातपुते, बाबासाहेब गायसमुद्रे, संतोष सावंत, उत्तम ढगे, अमर सोळंके, शेख शफिक इ. कॉंग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.




# ज्ञानदीप विधालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## ध्वजारोहण अतुल शिनगारे यांच्या हस्ते संपन्न

धारूर / प्रतिनिधी

ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्र, किल्ले धारूर येथे प्रजासत्ताकदिन उत्साहात व विवीध कार्यक्रमानी साजरा करण्यात आला यावेळी ध्वजारोहण पालक व युवा पत्रकार अतुल शिनगारे यांचे हस्ते करण्यात आले.. स्काऊड गाईड पथकाचे पथसंचलन व मानवंदना सर्वाना आकर्षीत करणारी होती.

दि २६ जानेवारी २०२५ वार रविवार रोजी ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ज्ञानदीप विद्यालयमध्ये ध्वजारोहण कार्यक्रम घेण्यात आला. प्रथमतः महात्मा गांधी, भारत माता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण युवा पत्रकार, पालक अतुल सर्जेराव शिनगारे याचे हस्ते करण्यात आले यावेळी प्रमुणे म्हणुण जेष्ठ पत्रकार नागनाथ सोनटक्के, सय्यद शाकेर, सेवानिवृत्त




केद्रप्रमुख अरविंद सुरवसे, अड राजकुमार गायसमुद्रे, अड महादेव वाव्हळ, पत्रकार सतीश पोतदार, रवि गायसमुद्रे आदी उपस्थीत होते यावेळी प्रभातफेरी, स्काऊट गाईड संचलन, देशभक्तीपर गीतगायन, विद्यार्थी वाढदिवस, सांघिक खेळाचे बक्षीस वितरण अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचल व आभारप्रदर्शन शिक्षक मुंजाराम निरडे यांनी केले या कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार २०२५ जाहीर

**पांडुरंग जाधव,अशोक जोशी, हनुमंत गावडे, सोपानराव निंबोरे,निसार शेख, विजयकुमार गाडेकर,अशोक भांडेकर,हमीद पठाण,शरद तळेकर,बापू खैरे,शबनम काझी,प्रतिक्षा मेश्राम, अशोक डोके,भंडारी,सानप,आदक, भोपळे यांच्यासह आदींचा समावेश कडा (प्रतिनिधी) आष्टी मतदार संघाचे माजी आमदार तथा शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष भीमसेन धोंडे यांचे माता-पिता यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित या वर्षीच्या (एकविसावा) गंगाई बाबाजी महोत्सव २०२५ मधील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना देण्यात येणाऱ्या 'गंगाई- बाबाजी आदर्श पुरस्कारांची' घोषणा नुकतीच करण्यात आल्याची माहिती या महोत्सवाचे संकल्पक माजी आमदार भीमसेन धोंडे तसेच संयोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी दिली.**

आष्टी येथील भगवान महाविद्यालयाद्वारा आयोजित हा महोत्सव ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये संपन्न होत आहे. गुरुवार दि ३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता माजी मंत्री सुरेश नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आ.भीमसेन धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे.उद्घाटनानंतर याच दिवशी महाविद्यालयीन वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धा घेण्यात येतील. शुक्रवार दि. ३१ जानेवारी रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत महाविद्यालयाचे



वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केलेले आहे. शनिवार दि १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता गंगाई बाबाजी आदर्श पुरस्कार विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे,प्रसिद्ध सिनेअभिनेत्री कल्याणी चौधरी,मा.आ.भीमसेन धोंडे, युवा नेते अजय धोंडे, तर यांच्या उपस्थितीत दिला जाणार आहे.तर दुपारी ४ वाजता खुल्या लावणी नृत्य स्पर्धा होणार आहेत. तरी वरील कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ दत्तात्रय वाघ, उपप्राचार्य डॉ ज्ञानदेव वैद्य, उपप्राचार्य डॉ आप्पासाहेब टाळके, उपप्राचार्य सुनील भवर, डॉ बाळासाहेब गावडे, डॉ आबासाहेब पोकळे ,डॉ वंदना घोडके व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी यांचे मिलीया माध्यमिक शाळेच्या महिला कर्मचाऱ्यांच्या उपोषणाकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष

## तिसऱ्या दिवशीही महिला कर्मचारी यांचे उपोषण सुरूच

बीड /प्रतिनिधी

मिलिया माध्यमिक शाळा येथे जवळपास बारा वर्षाच्या पुढे कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यावर स्वतःला नोकरी मिळावी म्हणून २५ जानेवारी २०२५ पासून अमर उपोषण करण्याची अली वेळ. मिलिया माध्यमिक शाळेचे या अमर उपोषणाकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याची चर्चा होत आहे.




रहेमत बेगम अजमत उल्ला खान या महिला कर्मचाऱ्यांनी मिलिया माध्यमिक शाळेत बारा वर्षापेक्षाही जास्त काळ नोकरी केली आहे. फक्त तीनशे रुपये महिना घेऊन फक्त संस्थाचालक या नोकरीवर कायम करतील या अपेक्षेने निमुटपणे रहेमत बेगम ह्या काम करत होत्या. त्याने इमाने इतबारे प्रामाणिकपणे काम केले. ज्यावेळेस पर्मनंट करण्याची वेळ आली त्यावेळेस. मिलिया माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, संस्थाचालक, जिल्हा परिषद शिक्षण विभाग माध्यमिक यांनी संगणमत करून दुसऱ्याच व्यक्तीला त्यांच्या ठिकाणी नोकरी दिली. व त्यांना तुमचे वय जास्त झाले आहे म्हणून काढून टाकले व डावले. तुमच्या मुलीला शाळेवर काम करण्यासाठी पाठवा असे सांगितले मुलीनेही इमाने इतबारे मिलिया माध्यमिक शाळेत काम केले. परंतु संस्थाचालकाच्या स्वार्थी वृत्तीमुळे. रहेमत बेगम यांच्यावर अन्याय झाला, दुसऱ्या व्यक्तीकडून पैसे घेऊन त्यांच्या जागेवर नोकरी बहाल केली. तात्कालीक मुख्याध्यापक व संस्थाचालकाने त्यांचे सर्विस बुक देखील गायब केले आहे. व त्यांचा कुठलाच पुरावा संस्थेत काम केलेला ठेवला नाही. असा आरोप संस्थेवर करण्यात आला. वारंवार विनंती करून देखील काहीही उपयोग झाला नाही.

त्यानंतर मात्र रहेमत बेगम यांनी राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे रीतसर माहिती मिळावी यासाठी तक्रार दाखल केली. त्यानंतरही मिलिया माध्यमिक शाळेचे संचालक व मुख्याध्यापक सय्यद अब्दुल सत्तार सय्यद अब्दुल जब्बार व सिद्दिकी मोहम्मद इरफान शादुल्ला पि. मोहम्मद गाजियोदिन यांनी अपिलावर अपेक्षित कारवाई केली नाही. व या ठिकाणी कलम १९(६) चा भंग झाला. जिल्हा परिषद बीड शिक्षण अधिकारी यांनी कलम १९ (६) चा भंग झाला आहे. यावर कारवाई करणे अपेक्षित होते मात्र अद्यापही यावर शिक्षण विभागाने कारवाई केली नाही. उलट या ठिकाणचे जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी नागनाथ शिंदे उद्धटपणाची भाषा बोलतात, उद्धटपणाची भाषा करत आहेत. नागनाथ शिंदे शिक्षण अधिकारी माध्यमिक विभाग जिल्हा परिषद येथे संस्थाचालक व मुख्याध्यापक यांची मिली भागात असल्याने या महिला कर्मचाऱ्यावर अन्याय झाला आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभाग माध्यमिक यांच्याकडून योग्य ती कारवाई व्हावी या मागणीसाठी गेल्या तीन दिवसापासून ही महिला उपोषणाला बसली आहे. तात्काळ त्यांच्या मागणीचा विचार केला जावा यासाठी हे उपोषण सुरूच आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभाग कारवाई करणार का याकडे सर्वांचे लक्ष आहे.




## खडकत येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित वकृत्व स्पर्धा संपन्न

आष्टी /प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील खडकत येथील जिल्हा परिषद प्राथमिक विद्यालय व रामचंद्र (दादा) धस माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या ठिकाणी प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रवादी युवक काँग्रेस व युवा स्वाभिमान संघ यांच्या वतीने बालमित्र वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.ही स्पर्धा मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाची ठरावी व या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व कौशल्य आत्मविश्वास आणि सामाजिक भान वाढावे यासाठी ही स्पर्धा घेण्यात आली.जिल्हा परिषद प्राथमिक विद्यालय मधील बालमित्र वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्रगती अतुल शिंदे, द्वितीय क्रमांक जैनब लियाकत तांबोळी, तृतीय क्रमांक बुशरा आसिम शेख हिने पटकावला.तसेच रामचंद्र दादा धस माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मधील बालमित्र वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक सायली शरद शेंडकर द्वितीय क्रमांक अनुष्का अशोक शेंडकर तृतीय क्रमांक ऋतुजा सुभाष भोसले हिने पटकावला. ही स्पर्धा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पुणे शहर सचिव व युवा स्वाभिमान संघ तथा युवक संघटन चे संस्थापक अध्यक्ष आतिक तांबोळी यांनी आयोजित केली होती. या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी गावचे आजी माजी सरपंच उपसरपंच ग्रा पं सदस्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## पोलिस हेड कॉन्स्टेबल दत्ता दुधाळ यांचा पोलिस महासंचालक प्रशस्तीपत्रने गौरव

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलिस दलात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राज्याचे पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी बीड जिल्हा पोलीस दलातील पोलीस हेड कॉन्स्टेबल दत्ता भीमराव दुधाळ यांचा सन्मानपत्र देऊन गौरव केला असून हे सन्मानपत्र नुकतेच बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते दत्ता दुधाळ यांना देण्यात आले..गेल्या अनेक वर्षापासून पोलीस दलामध्ये पोलीस हेड कॉन्स्टेबल दत्ता दुधाळ यांनी बीड जिल्ह्यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून राज्याचे पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी राज्यातील अशी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना सन्मानपत्र देऊन गौरव करीत असून बीड जिल्ह्यात हा बहुमान पोलीस हेडकॉन्स्टेबल दत्ता दुधाळ यांना मिळाला आहे. दत्ता दुधाळ यांनी पोलीस दलात काम करत असताना सामाजिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून जातीय सलोखा राखण्यासाठी दत्ता दुधाळ हे सातत्याने प्रयत्न करीत त्यांची सामाजिक सलोखा राखण्याची पद्धत अद्वितीय असून यामुळे ते जिल्हाभरात सुपरिचित आहेत. त्यांच्या या गौरवाबद्दल बीड जिल्ह्यातील पोलीस दलाच्या वतीने त्यांच्यावर शुभेच्छा चा वर्षाव होत आहे..

# महापुरुषांच्या विचाराने वाटचाल केली तर भारत देशाला जागतिक महासत्ताक व्हायला वेळ लागणार नाही - सौ. सुदामतीताई वाघ

## श्री महालक्ष्मी विद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी)

भारत देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या क्रांतिवीरांचे आणि देशभक्तांचे बलिदान हे आपल्याला प्रेरणा आणि स्फूर्ती देणारे आहेत. ही बाब लक्षात ठेवून आजच्या विद्यार्थ्यांनी आणि युवकांनी महापुरुषांचे विचार आत्मसात करून आपल्या जीवनाची वाटचाल केली तर भारत देशाला महासत्ता राष्ट्र व्हायला वेळ लागणार नाही असे मत शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ यांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणानंतर अध्यक्षस्थानावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव नामदेवराव वाघ, गणेश कदम, मसुराम कदम, रणजीत कदम, जगन्नाथ कदम, सरपंच शिवलिंग तोडकर, चंद्रशेन शेंडगे, दिलीप कदम, दत्तात्रय चव्हाण सर (मुख्याध्यापक), आत्माराम वाव्हळ सर आदी उपस्थित होते.



बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय मध्ये भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सौ सुदामतीताई वाघ यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणा नंतर आलेल्या मान्यवरांचे शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गाऊन तसेच शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या स्वागता नंतर शाळेतील काही विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीतांचा गायन केले. इयत्ता आठवीतील विद्यार्थीनींनी कु. आरती आडे हिने भारतीय प्रजासत्ताक दिनावर आपले विचार व्यक्त केले. यानंतर काही निवडक मान्यवरांनी विचार मांडले. तर अध्यक्षीय समारोप करताना सौ. सुदामतीताई वाघ म्हणाल्या की, २६ जानेवारी हा आपला प्रजासत्ताक दिवस आहे. २६ जानेवारी १९५० पासून भारतीय राज्यघटना अंमलात आली. त्यामुळे खऱ्या अर्थाने २६ जानेवारी दिन प्रत्येक भारतीयांचा स्वातंत्र्याचा दिन आहे. भारतीय प्रजासत्ताक दिन हा आपल्या सर्वांसाठी आनंदाचा उत्साहाचा आणि अभिमानाचा दिवस आहे. भारतीय संविधान सर्व जाती धर्माच्या नागरिकांना ऊर्जा देणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहून प्रत्येक माणसाला स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. देशाच्या नागरिकांना हे स्वातंत्र्य बहाल करण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह भारत देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या लाखो क्रांतिवीरांचे आणि देशभक्तांचे बलिदान हे आपल्याला प्रेरणा आणि स्फूर्ती देणारे आहेत. ही बाब लक्षात ठेवून आजच्या विद्यार्थ्यांनी आणि युवकांनी महापुरुषांचे विचार आत्मसात आपल्या जीवनाची वाटचाल केली तर भारत देशाला जागतिक महासत्ताक व्हायला वेळ लागणार नाही. त्यामुळे प्रत्येक नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी आपले जीवन उज्वल करण्यासाठी महापुरुषांच्या विचार आत्मसात करावे असे आवाहन यावेळी सौ. सुदामती ताई वाघ यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले तर आभार श्री दत्तात्रय चव्हाण सर यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पुरुषोत्तम पुरी येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वेशभूषा परिधान करून सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला

माजलगाव ।सुनील थोरात

तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी या ठिकाणी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे व संविधानाचे महत्त्व सांगण्यात आले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र मेहनत घेऊन संविधान लिहिले व आज त्याच संविधानावर आपला देश चालतो या संविधानाच्या माध्यमातून इथल्या प्रत्येकाला यांना न्याय देण्याचं काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त असा प्रतिसाद दाखवला व सहभाग घेऊन वेगवेगळ्या वेशभूषा करून नृत्य गायन नाटक इत्यादी सादर केले. सांस्कृतिक कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते तसेच या कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक क्षेत्रात असलेल्या आवडी नुसार त्याला आपले



कलागुण दाखवण्याची संधी मिळते यामुळे येणाऱ्या काळात त्या विद्यार्थ्याला याचा नक्कीच फायदा होतो यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमाची गरज वेगवेगळी वेशभूषा परिधान करून विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले त्यामुळे विद्यार्थ्यांचे गावकऱ्यांच्या वतीने कौतुक केले जात आहे.यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने विद्यार्थ्यांना ११००० रुपयाचे शाळेला भेट म्हणून विद्यार्थ्यांच्या विकासासाठी देण्यात आले.या कार्यक्रमासाठी गावकऱ्यांनी आवर्जून उपस्थिती लावली तसेच याप्रसंगी शाळेचे सर्व शिक्षक वृंद ,शालेय व्यवस्थापन समिती व गावातील नागरिक यांची उपस्थिती होती.

# सोनी रामखेलावन शर्मा यांचे आमरण उपोषण

## ग्रामरोजगार सेवक रमेश राठोड व अनंत जाधवर यांना बेकायदेशीररित्या पदावरून काढल्या बद्दल

माजलगाव /प्रतिनिधी

रमेश राठोड व अनंत जाधवर यांनी बेकायदेशीर व चुकीचे कामे करण्यास नकार दिल्यामुळे त्यांना ग्राम रोजगार सेवक या पदावरून काढून टाकण्यात आलेले आहे या प्रकरणाची सखोल चौकशी करून त्यांना पदावर पूर्ववत घेणे यासाठी सोनी रामखेलावन शर्मा यांनी आमरण उपोषण चालू केलेले आहे.ग्रामपंचायत गोविंदवाडी , तालुका माजलगाव, जिल्हा बिड, येथे ग्रामपंचायत स्तरावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्यरत ग्रामरोजगार सेवक श्री अनंत बन्सिधर जाधवर यांना व

ग्रामपंचायत लोनवळ बाबी, तालुका वडवणी, जिल्हा बिड, येथे ग्रामपंचायत स्तरावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्यरत ग्रामरोजगार सेवक श्री रमेश चंदू राठोड यांना गावातील राजकीय दृष्ट भावनेने प्रेरित होऊन दुय्यम म्हणजे दुसऱ्या ग्रामरोजगार सेवकांची नियुक्ती केलेली आहे, ती नियुक्ती रद्द करण्यासंदर्भात त्या ग्रामपंचायतीला सुचना देवून, ग्रामसभेमार्फत झालेली बेकायदेशीर नियुक्ती, ग्रामसभेमार्फत रद्द करण्यासंदर्भात सुचना देवून नियुक्ती रद्द करण्यात याव्यात.

शासनाने ठरवून दिलेले काम, बेकायदेशीरपणे करण्यासाठी नकार देणाऱ्या ग्रामरोजगार सेवकांला हेतूपुरस्सर त्रास देण्यासाठी दुय्यम, दुसऱ्या ग्रामरोजगार सेवकांची नियुक्ती करण्यात आलेली आहेत.वैयक्तिक सिंचन विहिरींचे लाभार्थी यांच्या शेतात पुर्वीच्या असलेल्या विहीरीच्या भरवशावर रोजगार हमी योजनेअंतर्गत नवीन विहिरीचा लाभ देवून, त्या विहीरीचे बेकायदेशीर काम सुरू आहे, असे ग्रामरोजगार सेवक रमेश चंदू राठोड यांनी ग्रामपंचायत अधिकारी धुमाळ साहेब यांना फोन करून सांगितले, पण काहीच कारवाई झाली नाही.पंचायत समितीचे ऑपरेटर यांनी मस्टर जनरेट करून पेमेंट सुद्धा केले आहे, ग्रामसभेत सरपंच ह्यांच्या मुलाने आधीच लाभार्थी यांच्या शेतात उपलब्ध असलेल्या विहीरींचे पेमेंट का करत नाही, ह्या कारणाने ग्रामसभेत रोजगार सेवकाला कामावरून कमी करण्यात आले आणि त्यांच्या जागी नवीन ग्रामरोजगार सेवकाची बेकायदेशीर नियुक्ती करण्यात आली आहे,याची विडिओ रेकॉर्डिंग सुद्धा ग्रामरोजगार सेवक यांच्या कडे उपलब्ध आहे. त्यामुळे मजूरांचे बोगस मस्टर भरण्यास नकार दिल्याने ग्रामरोजगार सेवकांच्या विरोधात गावातील लोकांकडून खोट्या तक्रारी दाखल करण्यात आल्या आणि परिणामी ग्रामरोजगार सेवकाच्या जागेवर, बेकायदेशीर काम करणेसाठी दुसऱ्या ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्यामुळे दिनांक २५ जानेवारी २०२५ पर्यंत गाव लोनवळ बाबी, तालुका वडवणी,जिल्हा बिड येथील ग्रामपंचायती मध्ये ज्या दुय्यम, दुसऱ्या ग्रामरोजगार सेवकांची नियुक्ती करण्यात आलेली असेल ती रद्द करण्यासंदर्भात पावले उचलण्याचे आदेश देऊन बेकायदेशीर नियुक्ती रद्द करण्यात यावी यासाठी आज दिनांक २६ जानेवारी २०२५ पासून मी निवेदन कर्ता गाव वडाळी, तालुका मेहकर, जिल्हा बुलढाणा, येथे आमरण उपोषणाला बसलो आहे, आज आमरण उपोषणाचा पहिला दिवस आहे,होणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस संबंधित अधिकारी जबाबदार राहणार आहेत. असे शर्मा यांनी नवेदणात म्हटले आहे.हे निवेदन माननिय अवर सचिव, रोजगार हमी योजना विभाग मंत्रालय मुंबई, महाराष्ट्र, माननिय आयुक्त, रोजगार हमी योजना विभाग, आयुक्त कार्यालय नागपूर, माननिय तहसीलदार तथा कार्यक्रम अधिकारी रोजगार हमी योजना, तालुका वडवणी ,जिल्हा बिड, माननिय उपजिल्हाधिकारी साहेब रोहयो, तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक रोजगार हमी योजना बिड जिल्हा, माननिय मुख्यकार्यकारी अधिकारी साहेब ,जिल्हा परिषद बिड, माननिय गटविकास अधिकारी साहेब,तथा सहकार्यक्रम अधिकारी रोजगार हमी योजना,पंचायत समिती वडवणी,यांना अशा आशयाचे निवेदन देण्यात आले आहे .

## एसटी बस भाडे वाढीच्या निषेधार्थ शिवसेनेचे (उबाठा) अंबाजोगाईत तीव्र निदर्शने




अंबाजोगाई /प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने एसटी बस प्रवाशी भाड्यामध्ये १५% ची वाढ करून गोरगरीब जनतेवर अन्याय केला आहे सदरील भाववाढीच्या निषेधार्थ अंबाजोगाई तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने एसटी बस डेपो व उपजिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई येथे २७ जानेवारी रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत तीव्र निदर्शने केले यावेळी एसटी बस डेपो परिसर व कार्यालय येथील परिसर शिवसैनिकांच्या घोषणा नि दनाणून गेला निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीने केलेल्या घोषणांचे पर्दाफाश होत असून एसटी भाडेवाढ रद्द न झाल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी दिला आहे.

या निदर्शनादरम्यान शिवसेना शहरप्रमुख अशोक हेडे, उपजिल्हाप्रमुख शिवाजी कुलकर्णी, उपतालुकाप्रमुख शिवनाथ गुजर, श्रीकांत कदम,भाऊसाहेब देशमुख सुधाकर कचरे दिलीप भिसे सूर्यकांत हावळे, सुंदर धोत्रे शिवकांत कदम, बाळासाहेब वाघाळकर, शंकर भिसे,




**प्रतिनिधी -लऊळ क्र २**

**तालुका वडवणी जिल्हा बीड येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय समिती व्यवस्थापन. जनार्धन शिंदे व रामेश्वर लहाने यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाची सुरुवात झाली मुख्याध्यापक श्री करांडे सर .श्री कांबळे सर. भड सर.श्री कमलाकर सर. युवा प्रशिक्षणार्थी श्री. श्रीकृष्ण शिंदे सर यांच्या उपस्थितीत मुला मुलींनी कलेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. तसेच युवा तरुण मित्र व गावकरी मंडळ यांचे सहकार्य**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT